# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र.तंशिप्र-१२२५/प्र.क्र.१४/जाहीर सूचना/२०२५/२३१६ दिनांक - १०.०७.२०२५.

## जाहीर सूचना

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता तंत्रशिक्षण विभागांतर्गत घेणाऱ्या विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरु आहे. ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी अर्ज सादर केले आहेत, अशा उमेदवारांनी आपले अर्ज पडताळणी प्रक्रियेकरीता दिलेल्या कालावधीमध्ये पुर्ण करुन घ्यावी. तद्नंतर संबंधित अभ्यासक्रमांची तात्पुरती गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी तात्पुरत्या गुणवत्ता यादी मधील स्वत:ची माहिती बरोबर आहे याची खात्री करुन घ्यावी.

उमेदवारांना तात्पुरत्या गुणवत्ता यादीमध्ये काही त्रुटी आढळल्यास तक्रारी निवारणाच्या ३ दिवसांच्या कालावधीत पुढील कार्यवाही करावी.

- ज्या उमेदवारांनी ऑनलाईन पडताळणीचा (E-Scrutiny Center) पर्याय निवडलेला आहे, अशा उमेदवारांना तात्पुरत्या गुणवत्ता यादीमध्ये (Provisional Merit List) काही हरकती असल्यास आवश्यक दुरुस्तीकरिता उमेदवारांच्या लॉगिनद्वारे तक्रार (Grievance) नोंदवावी.
- अशा उमेदवारांचा अर्ज दुरुस्तीसाठी उमेदवाराच्या लॉगिनमध्ये दुरुस्तीकरीता उपलब्ध (Unlock) करुन दिला जाईल.
- उमेदवाराने कोणत्याही दुरुस्ती/सवलतीसाठी दाव्याची पुष्टी करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सुधारीत करुन (Edit) पुन्हा सादर (Submit) करावा. (उदा. एसईबीसी प्रवर्गातील उमेदवाराकडे सुरुवातीला जात प्रमाणपत्र नसताना त्याने खुल्या प्रवर्गातून अज सादर केला होता. तद्नंतर तक्रार निवारण कालावधीमध्ये उमेदवारास जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेयर (NCL) प्राप्त झाले आणि उमेदवारास जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्याची पावती देखील प्राप्त झाली असेल तर उमेदवारास संबंधित प्रवर्गातून अर्ज करता येईल.)
- ज्या उमेदवारांनी प्रत्यक्ष अर्ज पडताळणीचा (Scrutiny Center) पर्याय निवडलेला आहे, अशा उमेदवारांचे काही हरकती असल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी मुळ प्रमाणपत्रासहीत प्रत्यक्ष पडताळणी केंद्रावर जावून त्रुटींचे निराकरण करावे.
- वैध हरकती/ दावे/ त्रुटींची दखल अंतिम गुणवत्ता यादीमध्ये (Final Meri List) घेण्यात येईल. अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द झाल्यानंतर कोणत्याही हरकतींची नोंद घेतली जाणार नाही.

सही/-
आयुक्त
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई